श्रीगणेशायनमः॥श्रीसरस्वत्यैनमः॥श्रीगुरुभ्योनमः॥श्रीकाळभैरवायनमः॥देह
त्रयविरहितायनमः॥ ॥ॐनमोश्रीजनार्दना॥नाहिंभवअभवभावना॥नेदखोनि
भिंनपणा॥नमनश्रीगुरुचरणासद्गुरुनाथा॥१॥ ॥श्लोक॥भक्त्याभागवतंभाव्यं
भावंकाव्यपागतः॥पकनात्सद्व्युत्पत्तिर्ज्ञानप्राप्तिस्तुभक्तितः॥१॥नमनश्रीए
कदंता॥एकपणेंतुंचिअंता॥येकिदाविसिअनेकता॥परिएकात्मतानमोडे॥१॥
तुजमाजीवासुचराचरां॥ह्मणौनिह्मणिजेलंबोदरा॥यालागीसकळावासोय
रा॥साचोकारातुंहोसि॥२॥तुजदेखेजोनरु॥त्यासिसुखाचासंसारु॥यालागी
विघ्नेहरु॥नामादरुतुजसाजे॥३॥हरुषतेंवदनगणराजा॥च्यारिपुरुषार्थत्या
चिभुजा॥प्रकाशियाप्रकाशिवोजा॥तोझळकतातुझानिजदंतु॥४॥पूर्वउत्तरमि
मांसादोन्हि॥लागलियाश्रवणस्थानि॥निशब्दादिवाचावदनि॥करजोडुनिउभि

या॥५॥ येकेंचिकाळेंसकळश्रुष्टि॥ आपुलेपणेंदेखतउठि॥ तेचितुझीदेखणीदृष्टि॥ सु
खसंतुष्टिविनायका॥६॥ सुखांचेंपेललेंदोंद॥ नाभिआवर्त्तलाआनंद॥ बोधाचाभि
खेनागबंद॥ दिसेसन्नधसाजीरा॥७॥ प्रकृतिपुरुषचरणदोन्हिं॥ तळिंघालिसिवो
जाउनि॥ तयावरिसहजासनिं॥ पुर्णपणींमिरवसि॥८॥ तुझिअणुमात्रजालियाभे
टि॥ शोधितांविघ्ननपडेदृष्टि॥ तोडिसिसंसारफांसाटि॥ तोचितुझेमुष्टिनिजफरसु॥९॥
भावेंभक्तुजोआवडे॥ त्याचेंउगविसिभवसांकडें॥ वोढुनिकाढिसिआपणाकडे॥
निजनिवाडेंअंकुशें॥१०॥ साचेंनिरपेक्षुजोनिशेख॥ त्याचेंतुंचिवाढविसिसुख॥ देउनि
हरिखाचेमोदक॥ निववितिदेखनिजहस्तें॥११॥ सुक्ष्माहोउनिसुक्ष्मन॥ त्यामाजीतु
झेंअधिष्ठान॥ यालागीमुषकवाहन॥ नामाभिधानतुजसाजे॥१२॥ पाहातांनरुनाकुं
जरु॥ अव्यक्तव्यक्तिपरु॥ ऐसाजाणोनिनिर्विकारु॥ नमनादरुग्रंथार्थि॥१३॥ ऐसियाजी

१

गणनाथा॥ मीपणेंकैंचानमिता॥ अकर्त्ताचिजालाकर्त्ता॥ ग्रंथकथाविस्तारा॥१४॥ आतां
नमुंसरस्वति॥ जेसारासारविवेककृति॥ चेतनारूपेंइंद्रियवृत्ति॥ जेचाळितिसर्वदा॥१५॥
जेवाचेचिवाचक॥ जेबुद्धिचिद्योतक॥ जेप्रकाशाप्रकाशक॥ स्वयेंदेखसप्रभ॥१६॥ ते
शिवाआंगीशक्तिउठि॥ जेसीडोळयामाजीदृष्टि॥ किंरसुरसलेंदाविपुष्टि॥ फळप
णेंपाटिंफळाचा॥१७॥ साखरेआंगीस्वादु॥ किंसुमनामाजीमकरंदु॥ तैसाशिवशक्ति
समंधु॥ अनादिसिधुअतर्क्य॥१८॥ तेअनिर्वाच्यनिजगोडि॥ चंहुवाचामाजिवाढि॥
ह्मणोनिवागेश्वरिरोकडि॥ ग्रंथार्थिंचोरवटिचविदावि॥१९॥ सारासारनिवडितीजनिं॥
त्याहंसावरिहंसवाहनी॥ बैससिसहजासनिं॥ अगम्यपणिंअगोचर॥२०॥ तेपरम
हंसिंआरुढ॥ तिसिविवेकहंसजाणतिदृढ॥ जवळिअसतांनेदखतिमुढ॥ अभा
ग्येंमुढअतिमंद॥२१॥ तिचेंनिर्धारितांरुप॥ अरुपाचेंचिस्वरुप॥ तेआपुलेपणेंअ

मुप। कथानुरूपबोलवि। २३। हा बोलु भला जाला। म्हणोनि बोलें चि स्तविला। ते आध्या
सास्तुतिभावो उपजला। बोलिं बोला गोरवि। २४। ते वागविंसपरमेश्वरी। सर्वांगदे ला १ २
खणिसुंदरि। राहोनि सबाह्याभ्यंतरिं। ग्रंथार्थकुसरि वदवित्सये। २५। ते सदां संतुष्ट
सहज। म्हणोनि निरोपणा चढलें भोज। परिस्वक्रोपणाचा पुंज। मिंपणें मज नेंदिचये
वो। २६। वागदेवते चि स्तुति। वाचा चि जालि वदति। तेथ द्वैताचियें संपति। उमसुचि
त्तिं उमसेन। २७। तिणें बोलु बोलणें मोडिलें। त्यावरि निरोपण घडिलें। नों बलणें बो
लें बोल कीं सें मुळमौनातें तोडिलें। तिसि सेवकपणें दुसरा। होउनि रिघे नमस्कारा। तंवं मिं २
पणें सिंपरा। निजनिर्धारा पारुषे। २८। जेथ मिपणाचा अभावो। तेथ तुंपणा चा कैंचा
गवो। याहि वरि करिं निर्वाहो। अगम्यभावो निरोपणि। २९। जैस्या सागरावरि साग
रिं। चालति लहरि व्याहारिं। तेसें शब्दस्वरूपाकारिं। स्वरूपावरि शोभति। ३०। जैस्या

साखरेचिया कणिका। गोडियें भिन्न न व्हति देखा। तैसें निरोपणये रसाळ सुखा। ब्र
ह्मरसें देखा रसवृत्ति। ३१। तेथ मिंपणें सिं सरस्वति। बैसविलें एकला टरसवृत्ति। तेणें
अभिनवे शेषें देउ नित्रुप्ति। तें हे उद्गारये ति कथेचे। ३२। आतां वंदुं ते सज्जन। जे कां
आनंदचिद्घन। वरुषतालि स्वानंदजीवन। संतसज्जन निववाव्या। ३३। ते चैतन्याचे अ
लंकार। किं ब्रह्मविद्येचे श्रीघार। किं इश्वराचे मनोहर। निजमंदिरनिवास। ३४। ते अ
धिष्ठाना अधिवासु। किं सुखासि हि सोल्हासु। विश्रांतिसि विश्वासु। निजरहिवासु
कराव्या। ३५। किं ते भुतदयार्णव। किं माहेरा आलिक वेणे। नां ते निर्गुणाचे आवेव।
निजगौरवस्वानंदा। ३६। नां ते डोळयांतुल दृष्टि। किं तिचि देखणी पुष्टि। किं संतु
ष्टिसि तुष्टि। चरणांगुष्टिं जयाचे। ३७। ते पाहा ति जयाकडे। त्याचें उगवे भवसांक
डें। परब्रह्म डोळयांपुढें। निजनिवाडे उल्हासे। ३८। तेथ साधनचतुष्टय सायास।

नपाहातिशास्त्रचातुर्यविलास॥एकुधरिलापुरेविश्वास॥स्वयेंस्वप्रकासेंतिकरिति॥३९॥
तेजगामाजिसदाअसति॥जीवमात्रातेंदिसति॥परिविकल्पेंच्चिठकिजति॥नाहिंह्म
णतिनास्तिकयें॥४०॥मातियेचाद्रोणुकेला॥तोकोळिकाभावोफळला॥ह्मणोनिविश्वा
सेंविणनाडला॥जगुठकिलाविकल्पें॥४१॥येकायेकिंविश्वासतां॥तरिवाणिनाहिं
निजसता॥त्यांचेचरणिभावार्थता॥ठेवितांमाथाविश्वासें॥४२॥तेनमस्कारितां



अवस्यक॥करूनिठाकतिएक॥परिएकपणेंसेवक॥त्यांचाच्चिदेखस्वयेंहोआ
वें॥४३॥त्यांच्चियेसेवेच्चिगोडि॥ब्रह्मसुखाच्चिउपमाथोडि॥जेभजतिअनन्यआ
वडि॥तेजाणतिगाढिनिजचवि॥४४॥तेप्रकृतिसिंपर॥प्रकृतिरूपिंतेअवि
कार॥आकारविकारवेव्हार॥त्याचेनिसाचारबाधीना॥४५॥तेभोगावरिन
विठति॥त्यागावरिनुठिति॥आपुलियेसहजस्थिति॥स्वयेंवर्त्ततिसर्वदा॥४६॥ते

ॐ

ज्ञातेपणनमिरवति॥पिसेंपणनदाविति॥स्वरूपपुंजुविस्मृति॥गीळुनिवर्त्ततिनिजां
गें॥४७॥प्रेमाआंगीच्चिजीराला॥विस्मयोयेथेंच्चिविसरला॥प्रपंचुपरमार्थुयेकुजा
हाला॥हाहिठेलाविभागु॥४८॥स्मरणविस्मरणेंसिंगेलें॥देहदेहिचहारपलें॥आंतु
बाहेरिपणगेलें॥गेलेंठेलेंस्मरेना॥४९॥स्वप्नजागृतिजागतांगेलि॥सुषुप्तिसाक्षि
त्वेंसिबुडालि॥उन्मनिहवेडावलि॥तुरियाठेलितटस्त॥५०॥दृश्यद्रष्टेनिसिंगेलें॥
दर्शनयेकलपणेनिमालें॥तेंनिमणेपणाहिंविरालें॥विरवितेंनेलेंविरणेनि॥५१॥ज्ञा
नअज्ञानातेंघेऊनिगेलें॥तवंज्ञातेपणहिंबुडालें॥विज्ञानआंगीघडलें॥परिनवे
जडलेंहेंनमनि॥५२॥यापरिजेनिजसज्जन॥तिहिंकरावेंसावधान॥द्यावेंमजअ
वधान॥हेंविज्ञापनबाळकें॥५३॥सुर्यसदांप्रकाशघन॥अग्निसदांदेदीप्यमा
न॥तैसेसंतसदांसावधान॥द्यावेंअवधानहेंबाळकमाझें॥५४॥तवंसंतसज्जन

आध्या १

एकवळा॥ थोरकरुनियांसोहळा॥ आज्ञापीलोंवेळवेळां॥ ग्रंथकविकळाप्राकृत॥ ५५॥
येकांतिंलोकांतिं॥ थोरसाक्षेपुकेलासंतिं॥ तरिसांगाजीमजप्रति॥ कोणेग्रंथिंप्रवर्त्तो॥
॥ ५६॥ पुराणिंश्रेष्ठभागवत॥ त्याहिमाजिउद्धवगीत॥ तुवांप्रवर्तावेंतेथ॥ वक्ताभगवं
ततुजसाह्य॥ ५७॥ आह्मांसिपाहिजे ज्ञानकथा॥ वरितुजसारिखारसाळवक्ता॥
तरिस्तुतिसांडुनिआतां॥ निरोपणतत्वताचालवीं॥ तुजसंतस्तवनिउछावो॥ हा
तवंकळलाभावो॥ तरिकथेचालवलाहो॥ निजनिर्वाहोउपपाद्दिं॥ ५८॥ यांसंताचेनिह्म
पावचनें॥ येकाकिआनंदलामनें॥ तेणेंवाक्यपसायदानें॥ स्वानंदघनेंउल्हासे॥ ६०॥
जैसामेघाचेनिगर्जनें॥ मयोरउपमांपाहगगनें॥ नानाजीवेंनिजीवनें॥ जेविंचोकु
मनेंउल्हासे॥ ६१॥ कांदेखोनिचंद्रकर॥ उलोंलागेचकोर॥ तैसेंसंतवदनिंजेउत्तर॥
आलेंथोरसुखावित॥ ६२॥ थोरसुखाचांकेलोंस्वामिं॥ तुमचेंपुरतेकराल तुह्मी॥

तरिवांयांचिकामिंपणेंमिं॥ मनोधर्मिंवळगेजो॥ ६३॥ परिसमर्थाचिआज्ञा॥ दासान
करवेअवज्ञा॥ तरिसांगीतलिजेसंज्ञा॥ तेकरिनआज्ञास्वामिचि॥ ६४॥ परितुह्मिंएक
करावें॥ अखंडअवधानमजद्यावें॥ तेणेंदिठिवेनिआघवे॥ पावेलस्वभावेंनिजसि
द्धि॥ ६५॥ अगातुह्मीयामनामाजीमन॥ ज्ञाद्धिंगेविलेंसेअनुसंधान॥ यालागीनिज
निरोपण॥ चालविंजाणसवेग॥ ६६॥ आतांवंदुंकुळदेवता॥ जेंयेकापकियकनाथा॥
तेएकवांचुनिसर्वथा॥ आणिककथाकरुनेंदि॥ ६७॥ येकरुपदाविलेंमनिं॥ तवंएकचि
दिसेजनिवनिं॥ येकचिकानिवदनिं॥ येकपणिंएकविरा॥ ६८॥ तेशीवशक्तिरुपेंदोन्हि॥
लेउनिमिरवेयेकपणिं॥ एकपणेजालिगुर्विणी॥ प्रसवेएकपणिंयकांगविरु॥ ६९॥
तेयेकेचिरुपेंयेकविरा॥ प्रसवलिबोधफरसधरा॥ जयाचाकोंदरारा॥ महाविरांअ
भिमानियां॥ ७०॥ तेणेंउपजोनिनिवटिलिमाया॥ आज्ञापाळुनिसुखदेपीतया॥

म्हणोनितोजाहालाविजया॥लवलाह्यादिग्मंडळिं॥७१॥जोवासनासहस्रबाहो॥छे आध्या १
दिलासहस्रार्जुनअहंभावो॥स्वराज्यकरुनियांपाहो॥अर्पिसमेवोस्वजातियां॥७२॥
तेणेंमारुनिमाताजीवविलि॥तेचिकुळदेवताआलाजालि॥परिस्वनावेंख्यातिके
लि॥एकात्मबोलिएकनाथा॥७३॥तेजैंपासुनिनिवटलि॥तैंपासुनिप्रकृतिपालटलि॥
रागलागेंशांतजाहालि॥निजमाउलिजगदंबा॥७४॥तयावोसिंगांघेउन॥थोरदि
धलेंआस्वासन॥विषमसंकटिंसमाधान॥स्वनामस्मरणकेलयां॥७५॥तेजय
जयजगदंबा॥उदोम्हणेग्रंथारंभा॥मतिमाझिस्वयंभा॥योगगर्भाप्रगटलिं॥७६॥ ५
आतांवंदुजनार्दन॥जोभवगजपंचानन॥जनिंविजनिंसमान॥सदासंपूर्णसमत्वें॥
॥७७॥ज्याचेनिकृपाआपांगें॥देहिनेदखतिदेहांगे॥संसारटवाळवेगें॥केलेंवाउगेंभ
वस्वप्न॥७८॥जयाचेनिकृपाकटाक्षें॥अलक्षलक्षेंविणलक्षे॥साक्षिविसरलीसाक्षे॥

निजपक्षेंगुरुलें॥७९॥तेणेंजीवेंविणजिवविलें॥मृत्यनमरणचिमारिलें॥दृष्टिघेउनिदा
खविलें॥दिखणेंकेलेंसर्वांग॥८०॥देहदेहिंविदेहकेलें॥सेखिंविदेहपणतेंहिंनेलें॥नेलेप
णहिहारपलें॥उरिउरलेंउर्वरिता॥८१॥अभावोभावेंसिगेला॥संदेहोनिसंदेहेसिंनिमा
ला॥विस्मयोविस्मयीबुडाला॥वेडावलास्वानंदु॥८२॥तेथआवडिहायेंभक्तु॥तंवदेवोचि
भक्तपणाआंतु॥मगभज्यभजनाचाअंतु॥दाविप्रांतुस्वलिळा॥८३॥नमितेंनेणोंकाय
केलें॥नम्यचिआंगीघडलें॥घडलेंमोडलेंमोडुनिं॥८४॥दृश्यद्रष्टाजाण॥दोंहिंएकचि
मरण॥दर्शनहिंजालेंक्षिण॥दिखतेपणगीळुनि॥८५॥आतांदेवोचिआघवा॥तेथभ
कुनयेभक्तभावा॥तवंदेवोहिमुकलादेवा॥देवस्वभावाविसरोनि॥८६॥देवोदेवपणें
दाटला॥भक्तुभक्तपणेंआटला॥दोहिंचाहिअंतुआला॥अभेदंजालाअनंतु॥८७॥
अत्यागुत्यागेंसिंविराला॥अभोगुभोगेंसिंउडाला॥अयोगुयोगेंसिंबुडाला॥योग्य

तेचागेलाअहंभावो॥८८॥ऐसियाहिवरिअधिकसोसु॥सायुजामाजीहोतसेदासु॥ आध्या १
तेथिलसुखाचासौरसु॥अतिजविनासुअगोचरु॥८९॥शिवेंशिउचियजिज्ञे॥हें ऐ
सियेअवस्थेसिसाजे॥येरुविंबोलेंचिबोलिजे॥निजभजन॥९०॥येअभिन्नसुखसे
वेआत॥नारदुआनंदेंनाचतगात॥शुकसनकादिकसमस्त॥जालेनिजभक्तयेणें
सुखें॥९१॥सागरिंभरेभरितें॥तेंभरितेंभरितरियातें॥तैसेंचिदेवेंदेवपणेंयेथें॥केलेंमा
तेंनिजभक्त॥९२॥सागरसरिताजीवनएक॥परिमिळणिंभजनदिसेअधिक॥तैसेंए
कपणेंचिदेख॥भजनसुखउल्हासे॥९३॥वामसव्यदोनिभाग॥परिदोंनांवियेकुआंग॥ ६
तैसादेवाभक्तविभाग॥देवपणिंसांगअभासे॥९४॥तेविआपुलेपणाचेनिमानें॥
भक्तकेलाजनार्दनें॥परिकायावाचामनें॥वर्त्तविजेणेंतैसर्वार्थि॥९५॥तोमुखाचें
जालानिजमुख॥दृष्टांतेंप्रगटेसन्मुख॥तोचिविवेकेंकरुनिदेख॥करविलेंखकं चो ४

ग्रंथार्थे॥९६॥परिनवलत्याचेंलाघव॥अभंगीघातलेंमाझेंनाव॥सेखिंनावाचानि
जभाव॥उराव्यागवोनुरविचि॥९७॥यावचनार्थासंतोषला॥ह्मणेभलारेभलाभला॥
निजभाविकुतुंचिसंचला॥प्रगटकेलागुह्यार्थु॥९८॥हेस्तुतिकिनिरोपण॥ग्रंथपि
वकिंब्रह्मज्ञान॥साहित्यकिंसमाधान॥सज्ञानाहिजाणकळेना॥९९॥तुझाबोलचि
येकयेक॥सोलिंवविवेकाचाविवेक॥तोसंतोषासिसंतोख॥अत्यंतिकउपजवि॥१००॥
तुझेनिमुखेंजेंजेंनिघे॥तेंसंतहृदइसाचचिलागे॥मुमुक्षसारंगाचिंपाळिंगे॥रुंज
निजागेकरितिल॥१॥ग्रंथारंभुपडिलाचोख॥मुक्तमुमुक्षइतरलोक॥श्रवणमात्रेंचि
देख॥निजात्मसुखपावति॥२॥येणेवचनामृततुषारें॥ग्रंथभुमिकेविवेकांकुरें॥अं
कुरलियेकसरें॥फळसंभारेंसफळित॥३॥किंनिर्जिवाजीउआला॥नातरिसिधा
सिसिधिलाभुजाला॥किंनिजवैभवेंआपुला॥प्रियुमिनलापतिव्रते॥४॥तेसनि

हरुषानंदें॥ जीजीह्मणितलेंस्वानंदें॥ तुमचेनिपादप्रसादें॥ करिनविनोदेंग्रंथार्थ॥
॥५॥ रामप्रतापदृष्टि॥ शिळातरतिसागरापोटिं॥ किंवसिष्ठवचनासाठिं॥ तपेकाठिर
विमंडळिं॥६॥ किंयाज्ञवल्किच्यामंत्राक्षता॥ शुष्ककाष्ठांसपलवता॥ किंधर्मेंस्वा
नुसरता॥ केलासर्वथास्वर्गलोकिं॥७॥ तैसेंमाझेनिनावें॥ ग्रंथहोतिसुहावे॥ आज्ञा
प्रतापगौरवें॥ गुरुवैभवेंसार्थक॥८॥ घटितयेकाआणियेकादसें॥ रासिनक्षत्रयेक
चिअसे॥ त्यायेकामाजिजैंपुर्णदिसे॥ तैंदशादशांचेंदेअधिक॥९॥ मागापुढांयेकु
किजे॥ त्यानावेंयेकादशुह्मणिजे॥ तरियेकायेकपणेंसाहाजें॥ आलेंनिजवोजें
ग्रथार्थीं॥१०॥ तेथदेखणेंचिकरुनिदेखणें॥ अवघेंचिनिर्धारुनिमनें॥ त्यावरियेका
जनार्दने॥ टिकाकरणेंसार्थक॥११॥ पाहोनिदशामिचाप्रांतु॥ येकादशिच्याउदया
आंतु॥ येकादसिंवरिजगनाथु॥ ग्रंथार्थुआरंभि॥१२॥ ह्मणोनिएकादशाचिटि



का॥ येकादसिसिकरियेका॥ तेएकपणाचियासुखा॥ फळेलदेखायेकत्वें॥१३॥ आ
तांवंदुमहाकवि॥ व्यासवाल्मिकुभार्गवि॥ जयातेंउशनाकवि॥ पुराणगौरविबोलि
जे॥१४॥ तेंहिंआपुलियेविस्पति॥ वाढवाविमाझिमति॥ हेचिकरितुसेंविनति॥ ग्रंथु
समाप्तिन्याविया॥१५॥ वंदुआचार्यशंकरु॥ जोकांग्रंथार्थविवेकचतुरु॥ सारुनि
कर्मवनेंचिविचारु॥ प्रबोधदिनकरुप्रकाशला॥१६॥ आतांवंदुश्रीधर॥ जोभाग
वतव्याख्यातासधर॥ जयाचिटिकापाहातांअपार॥ अर्थसाचारपैंलाभे॥१७॥ इ
तरहिटिकाकार॥ काव्यकर्तेविवेकचतुर॥ त्यांचाचरणिंनमस्कार॥ ग्रंथासादर
तिहिहोवें॥१८॥ वंदुप्राकृतकवीश्वर॥ निवृत्तिप्रमुखज्ञानेश्वर॥ नामदेवाचांग
देववाटेश्वर॥ ज्याचेभाग्यथोरगुरुकृपा॥१९॥ जयाचेग्रंथपाहातां॥ ज्ञानहोएप्रा
कृतां॥ तयाचेचरणिंमाथा॥ निजात्मतानिजभावें॥२०॥ संस्कृतग्रंथकर्तेतेमहा

कवि॥ मांप्राकृतिंकायउणिवि॥ नविजुनिह्मणावि॥ कैसेनिकेविसुवर्णसुमनें॥ २१॥ आध्या १
कपिलेचेंलणावेंक्षिर॥ माइतरेचेंतेंकाएनिर॥ वर्णस्वादेंमधुर॥ दिसेसाचारसारि
खें॥ २२॥ जेंपाविजेसंस्कृतअर्थें॥ तेंचिलाभेप्राकृतें॥ तरिनमनावयायेथें॥ विषम
चित्तेंतेंकाइ॥ २३॥ कांनिरंजनिवसलाराणा॥ तरितोचिसेवकांपावनगवा॥ तेथसे
वेसिनवचतांपाहे॥ दंडिरावोनिजभृत्यां॥ २४॥ कांदुवळिआणिसमर्थ॥ दोहिंसि
रायेघातलेहात॥ तरिंदोघिसिहितेथ॥ सहजेंहोतसमसाम्य॥ २५॥ देशभाषावैभ
वें॥ प्रपंचुपदार्थिंपालटलिंनावें॥ परिरामकृष्णादिनामानवे॥ भाषावैभवेंपालटु॥ ८
२६॥ संस्कृतवाणिदेवेंकेलि॥ तरिप्राकृतचोरापासुनिजालि॥ असतुयाअभिमा
नभुलि॥ वृथाबोलिकायकाज॥ २७॥ आतांसंस्कृतअथवाप्राकृत॥ भाषाजालि
जेहरिकथा॥ तेपावनचितत्वता॥ सत्यसर्वथामानलि॥ २८॥ वंदुभानुदासुआतां॥

जोकांपितामहाचापिता॥ ज्याचेनिवंशभगवंता॥ जालासर्वथाप्रियकर॥ २९॥ जेणें
बाळपणिआकळिलाभानु॥ स्वयेंजालाचिज्ञानु॥ जिंतोनिमानाभिमानु॥ भगव
त्मावनुस्वयेंजाला॥ ३०॥ जयाचिपदबंदप्राप्ति॥ पांहोंआलीश्रीविठलमुर्त्ति॥ कानिचिं
कुंडलेंजगाज्योति॥ करितांरातिदेखिला॥ ३१॥ तयाभानुदासाचाचक्रपाणि॥ तया
चाहिसुतुसुलक्षणिं॥ तयासिसुर्यनामठेउनि॥ निजिंनिजहोउनि॥ भानुदासगेला॥
३२॥ तयासुर्यप्रभाप्रतापकिरणिं॥ मातेंप्रसवलिरुक्मिणि॥ ह्मणोनिरकुमाइजन
नि॥ आह्मालागुनिसाचचि॥ ३३॥ हेग्रंथारंभकळा॥ वंदिलिपुर्वजमाळा॥ धन्यनिज
भाग्याचिलिळा॥ आलोंवैष्णवकुळाजन्मोनि॥ ३४॥ तेवैष्णवकुळिंकुळनायक॥ नारद
प्रह्लादसनकादिक॥ उधवअक्रुरश्रीशुक॥ वसिष्ठादिकनिजभक्त॥ ३५॥ तेवैष्ण
वसकळ॥ ग्रंथार्थिंअवधानशिळ॥ ह्मणोनिवैष्णवकुळमाळ॥ वंदिलिसकळग्रंथा॥

र्थि॥३६॥उपजलोंज्याचियागोत्रा॥नमनतयाविश्वामित्रा॥जोकांप्रतिसृष्टिधात्रा॥
गायत्रिमंत्रामहत्व॥३७॥जोउपनिषद्विवेकि॥तोवंदिलायाज्ञवल्कि॥जोकविक
र्तेयातेंपोखि॥कृपापियुषिंवरुषोनि॥३८॥नमनभुतमात्रांअसेखा॥तेणेंविश्वंभ
रुजालासखा॥ह्मणोनिग्रंथारंभुदेखा॥आलानेटकासंमता॥३९॥आतांनमुद
तात्रया॥जोकांआचार्याचाआचार्या॥तेणेंप्रवर्त्तविलेंग्रंथकार्या॥अर्थवाव
यानिजबोधु॥४०॥तोशुद्धालेदाविलु॥अर्थुअर्थेप्रकाशितु॥भगवत्कृपणाचिमा
तु॥स्वयेंवदवितुयथार्थे॥४१॥तोह्मणेश्रीभागवत॥तेभगवंताचेंहृद्गत॥त्या
सिचिहोएप्राप्त॥ज्याचेंचित्तनिरतभगवंतिं॥४२॥तोहेंज्ञानकल्पादि॥चतुश्लोक
पदबंदि॥उपदेशिलासबुधि॥निजात्मबोधिंविधाता॥४३॥नवलतयाचास
द्भावो॥शब्दमात्रेंजालाअनुभवो॥बापुसद्गुरुकृपापाहा॥केलानिसंदेहोपर

मेष्टि॥४४॥तोचतुश्लोकिचाबोधु॥गुरुमार्गेंआलासुबुधु॥तेणेंउपदेशिलानारदु॥
अतिप्रबुधुभावार्थि॥४५॥तेणेंनारदुनिवाला॥अवघाअर्थमयचिजाला॥पुर्ण
परमानंदेंधाला॥नाचोंलागलानिजबोधें॥४६॥तोब्रह्मविणावाहु॥ब्रह्मपदेंगि
तिगातु॥तेणेंब्रह्मानंदेंनाचतु॥विचरेदुश्चतुब्रह्मसृष्टि॥४७॥तोआलासरस्वति
तिरा॥तंवदेखिलेंव्यासऋषिश्वरा॥जोसंशयाच्यापुरा॥अतिदुर्धरामाजिपडि
ला॥४८॥वेदार्थसकळपुराण॥व्यासेंकेलेंनिर्माण॥परितोनपवेचिआपण॥नि
जसमाधानस्वहिताचें॥४९॥तोसंशयसमुद्राआंतु॥पडोनिहोताबुडतु॥तेथपा
वलाब्रह्मसुतु॥नानिह्मणतुकृपाळु॥५०॥तेणेंयेकांतियेउनिदेखा॥व्यासासि
केलेंयेकमुख॥मगदाविलेच्यारिश्लोक॥भवमोचकनिर्दुष्ट॥५१॥तेसुर्यतेंनेद
खउनि॥गगनातेंहिचोरुनि॥कानातेंपरतेंसारुनि॥तेलाउपदेशुनिनिजबो

धु॥ तेंनारदाचेंवचन॥ करितसंशयाचेंदहन॥ तवंव्यासासिसमाधान॥ स्वसुखेंपुर्णहों
सरलें॥ ५३॥ मगश्रीव्यासेंआपण॥ भागवतदशलक्षण॥ शुकासिउपदेशिलेंजाण॥
निजबोधेंपुर्णसार्थक॥ ५४॥ तेणेंशुकुहिसुखावला॥ परमानंदेंनिवाला॥ मगस
माधिस्थराहिला॥ निश्चळेंगेलानिजशांति॥ ५५॥ तेथस्वभावेंविजाणा॥ समाधि
आलिसमाधाना॥ मगपरिक्षितिचियाब्रह्मज्ञाना॥ अवचटेंजाणातोआला॥ ५६॥
पाहावापरिक्षितिचाअधिकारु॥ तवंकळिसितेणेंकेलामारु॥ तरिधर्महोउनि
थोरु॥ दिसेअधिकारुपैंयाचा॥ ५७॥ कृष्णअसतांधर्मुजाला॥ पाठिंकळिभेणतो 
पळाला॥ परिहाकळिनिग्रहुनिगेला॥ धर्महोउनिभलाधैर्येअधिकु॥ ५८॥ अर्जु
नविर्यपरंपरानिर्वंश॥ सुभद्रामातामहिचेंगर्भलिंग॥ तोअधिकाररलउपालिंग॥
ज्यासिश्रीरंगरक्षितागर्भिंजाला॥ ५९॥ गर्भिंचिअसतांज्याभेण॥ स्पर्शोनशकेचि

शस्त्रद्रौण्य॥ त्याचेंअधिकारपण॥ सांगाव्याकोणसमर्थ॥ ६१॥ जेणेंरक्षिलेंगर्भाप्र
ति॥ त्यातेंपरिक्षिसर्वांभुतिं॥ यालागिंनावेंपरिक्षिति॥ अगाधस्थितिनावाचि॥ ६॥
तोअभिमन्याचापरिक्षिति॥ उपजलापावनकरितक्षिति॥ ज्याचेनिभागवताचिख्या
ति॥ घातलित्रिजगतिपरमार्थपंके॥ ६२॥ आंगिंवैराग्यविवेक॥ ब्रह्मालागीत्यक्तोदक॥
तयातेंदेखोनिश्रीशुक॥ अत्यंतिकुसुखावला॥ ६३॥ बापुकोपुब्राह्मणाचा॥ शापें
अधिकारुब्रह्मज्ञानाचा॥ तयाचाचरणिकायावाचा॥ निजभावाचानमस्कार॥ ६४॥
ब्रह्माहोनिब्राह्मणुथोरु॥ हेंमिचिकायफारकरुं॥ परिअद्यापिहृदयिंश्रीधरु॥
चरणालंकारुमिरवितु॥ ६५॥ म्हणोनिब्रह्म्याचादेवोब्राह्मण॥ हासत्यसत्यमाझा
पण॥ यालागींदेवरुपेंनारायण॥ उदरायेउनवाढला॥ ६६॥ म्हणोनिब्राह्मणभु
देव॥ हब्रह्मिचेनिजावेव॥ येथनभजतितेमंददेव॥ अतिनिदैवअभाग्य॥ ६७॥

ब्राह्मणप्रतापाचानव्हाहो॥ तिहिंआज्ञाधारकुकेलादेवो॥ प्रतिमाप्रतिष्टेसिपाहो॥
प्रकटेआयुर्भावोमंत्रमात्रें॥ ६८॥ तवंसंतह्मणतिकायपाहावें॥ जेंस्तवनिरचसिभा
वें॥ तेथप्रमयकाढिसिनिचनवें॥ साहित्यलाघवेंसाचार॥ ६९॥ गणेशआणिसरस्व
ति॥ बैसविलिब्रह्मपंक्ति॥ तेसिचिसंतस्तवनिंस्तुति॥ ऐक्यवृत्तिवदलासि॥ ७०॥ पाठिं
कुळआणिकुळदेवता॥ स्तवनिवदलासिजेकथा॥ तेऐकतांचिचित्तचित्ता॥ विसरेस
र्वथाश्रवणेंचि॥ ७१॥ जोचिभावोसंतचरणिं॥ तोचिभावोब्राह्मणिं॥ सुखिकेलेंगुरु
स्तवनि॥ धन्यवाणिपैंतुझि॥ ७२॥ तरितुझेनिमुखेंश्रीजनार्दन॥ स्वयेंवदताहेआ
पण॥ हेबोलतांचिखुण॥ कळलिसंपुर्णआह्मासि॥ ७३॥ चढतप्रमयाचेंभरितें॥
तेंनावेकआवरूनिचित्तें॥ पुढिलकथानिरोपणातें॥ करिनिश्चितेआरोहण॥ ७४॥
विसरलोंहोतोंहाभावो॥ परिभलादिधलाआठवो॥ याचिलागीसद्भावो॥ तुमचे



चरणिंपाहोठेविला॥ ७५॥ उणेंदेखालजेथें॥ तेंतेंकरावेंपुरतें॥ सज्जनामाजिसर
तें॥ करावेमातेंग्रंथार्थसिद्धि॥ ७६॥ तेह्मणतिभलाभलानेटका॥ बरविआयाआ
लिग्रंथपीठिका॥ आतांसंस्कृतावरिटिका॥ कविपारखकावदेवहिला॥ ७७॥ याचि
बोलावरिमाझाभावो॥ ठेउनिपावलोंपायांचाठावो॥ तरिआज्ञेसारिखाप्रस्तावो॥
करिनपाहोकथेचा॥ ७८॥ तरिनिमिष्यारण्याआंतु॥ सौनकादिकाप्रतिमातु॥ सुतु
असेसांगत॥ गतकथार्थुअन्वयो॥ ७९॥ मागांदाहिस्कंदिजाण॥ कथाजालिनवल
क्षण॥ आतांमोक्षाचेंउपलक्षण॥ सांगेश्रीकृष्णएकादसिं॥ ८०॥ जोचिदाकासिचा
पुर्णचंद्रु॥ जोयोगज्ञाननरेंद्रु॥ तोबोलताजालाशुकयोगींद्रु॥ परिसतानरेंद्रुप
रिक्षिति॥ ८१॥ तवंपरिक्षितिह्मणेस्वामि॥ याचिलागीत्यक्तोदकुमिं॥ तेचिकृपा
केलितुह्मिं॥ तरिधन्यआह्मिंनिजभाग्यें॥ ८२॥ अगाहेसाचारमोक्षकथा॥ ज्यां

सिमोक्षाचिआस्था॥तिहिंपावोदेउनिमनामाथा॥रिघावेंसर्वथाश्रवणादरि॥८३॥
भितरिनेउनियांकाना॥कानिद्यावेंनिजमन॥अवधानाकरूनिसावधाधान॥कथा
अनुसंधानधरावें॥८४॥बहुतिंअवतारींअवतरलादेवो॥परियेअवतारिंचानवला
वो॥देवांनकळेअभिप्रावो॥अगम्यपाहोहरिलिळा॥८५॥उपजतांचिमायेवेगळा
वाढिनलास्वयेंस्वलिळा॥बाळपणिंमुक्तिचासोहळा॥पुतनादिसकळा॥निजांगें
अर्पि॥८६॥मायेसिदाविलेंविश्वरूप॥गोवळांदाविलेंवैकुंठदिप॥परिगोवळेपणा
चेंरूप॥नेंदिचअल्पपालटों॥८७॥बाळुबळियातेंमारि॥अचाटजगादेखतांकरि॥
परिबाळपणाबाहेरि॥तिळुभरिनकेचि॥८८॥ब्रह्मआणिचोरिकरि॥देवोआणिव्य
भिचारि॥पुत्रकळत्रआणिब्रह्मचारि॥हेहिपरिदाखविलि॥८९॥अधर्मेवाढवि
अ ळाधर्म॥कर्मेंतारिलेंकर्म॥अनेमेंनेमिलानेम॥अतितिनिसिमनिर्दुष्ट॥९०॥याणें

संगेंचितोडिलासंगु॥भोगेंवाढविलायोगु॥त्यागेंविणकेलात्यागु॥अतिअव्यंगुनिर्दो
ष॥९१॥कर्मगहोआवयाबोध॥कर्मजाचेतोडिलेभेद॥भोगामाजिमोक्षपद॥दावि
लेंविषदप्रकटकरूनि॥९२॥भक्तिभुक्तिमुक्ति॥तिहिंकेलियएकपंक्ति॥कायवानुत्याचि
ख्याति॥खाउनिमातिविश्वरूपदावि॥९३॥त्याचियापरमात्मचरित्रा॥तुजसांगेनपर
मपवित्रा॥परिनिजबोधाचारवरायेअवतारि॥पवांडाकेला॥९४॥एकादशाचाना
त्पर्यार्थि॥संक्षेपेंसविस्तरेंमुक्ति॥बोलिलेंसेआद्यंतिं॥परमात्मस्थितिनिजबोधु॥
॥९५॥तेथनारदेंवसुदेवाप्रति॥संवादुनिमिजायंति॥सांगीतलिकथासंगति॥सं
क्षेपस्थितियानांव॥९६॥तेंचिउधवाचेपरमप्रिति॥नानादृष्टांतउपपति॥स्वमुखें
बोलिलाश्रीपति॥तेकथानिश्चितिंसविस्तर॥९७॥दशमिंनिरोधलक्षण॥मागांकेलें
निरोपण॥तेथधराभारअधर्मजन॥निर्दळिश्रीकृष्णनानायुक्ति॥९८॥ज्याचेनिपण

धर्मभावें क्षिति॥ सदां आक्रंदत होति॥ जीच्या साह्यालागी श्रीपति॥ पुर्णब्रह्मस्थि
ति अवतरला॥ १९॥ दुष्ट दैत्य आणि दानव॥ धराभार राजे सर्व॥ वधिता जाला श्रीकृ
ष्णदेव॥ तो गत कथाभाव शुक सांगे॥ २००॥ ॥श्रीशुक उवाच॥ ॥कृत्वा दैत्यवधं कृ
ष्णः सरामो यदुभिर्वृतः॥ भुवोवतारयद्भूरं प्रविष्टं जनयन्कलिं॥ १॥ टिका॥ पुर्णब्र
ह्म स्वयें श्रीकृष्ण॥ बळि बळराम लोकरमण॥ निघडे यादव मेळउनि जाण॥ दैत्यनि
र्दळण श्रीकृष्णें केलें॥ १॥ जे यादवन येति वधीं॥ तेथ श्रीकृष्ण करि बुधि॥ सखे स्वजन
स्वगोत्रांमधिं॥ कळह उत्पादि अति शीघ्र॥ २॥ उतरावया धराभार॥ कळह मिसें सारं
गधर॥ मारवि कौरवभार॥ पांडुकुमरक्षोभुनि॥ ३॥ श्लोक॥ ये कोपिताः सुबहु पां
डुसुताः सपत्नैः दुर्द्यूतहेळन कचग्रहणादिभिस्तान्॥ कृत्वा निमित्तमितरेतर
तः समंतान्हत्वान्टपान्निरहरत्क्षितिभारमीशः॥ २॥ टिका॥ दुष्ट केले जे मिंजति

घोर॥ ज्याचि सेना धराभार॥ ते वधार्थ करावया यकत्र॥ कलहाचें सुत्र उपजवि कृ
ष्ण॥ ४॥ येणें कृष्णसंकल्पउद्देशें॥ हो सरले कपट फांसे॥ तेणें कपटें बांधोनि कैसें॥
वधवि अनयासें कौरवभार॥ ५॥ जगीं द्युतखेळि जे दुष्टें॥ तेंहि आरंभीले कपटें॥ ध
र्मावरि फांसे खोटे॥ घालिति हटें दुर्बुद्धि॥ ६॥ बाळेभोळे अज्ञानजनि॥ तेंहि गांजि
तिना धर्मपत्नि॥ तेसाचचि धर्माचि मानिनि॥ आणिलि बांधोनि सभेपासिं॥ ७॥
दुस्यासनें धरिलि कच॥ तेणे चिवाढिलि कचकच॥ तें कर्म त्याचें त्यास॥ भवलें साच
त्या भवतें॥ ८॥ वनि कोण्हि कोण्हा नागवि॥ तो नागवे वा राजा आणवि॥ सभेसि राजा
उगाणवि॥ तें मृत्युचि पदवि मस्तका आलि॥ ९॥ अन्यायें विण नागवि रावो॥ तें धावणि
मांधांव देवो॥ द्रुपदिवस्त्राहरण पाहो॥ हा मुख्य अन्याव कौरवां॥ १०॥ अग्नीदाह
नें गरदानें॥ धनदारा अपहरणें॥ घाला घालुनि मारणें॥ शस्त्रपाणि होणें वधार्थी॥ ११॥

अवज्ञाआणिहेळण॥ दुरुक्तिजेधर्मछळण॥ हेंचिनिमित्तासिकारण॥ केलेसंपूर्णश्री
कृष्णे॥१२॥ पतिव्रतेचेंवस्त्राहरण॥ तेणेतत्काळपावेमरण॥ हेंचिकळहाचेंकारण॥
कुळनिर्दळणयेणेंकर्में॥१३॥ ऐसाजोधर्माचाविरोधि॥ त्यासिदेवोअवस्यवधि॥ या
लागिपांडवाचियेबुधि॥ असुग्रः त्रिशुधिउपजविकोपु॥१४॥ भूभारहरणच
रित्र॥ सखेस्वजनहृसुहृदस्वगोत्र॥ शास्त्रविवेकिअतिपवित्र॥ त्यामाजिविचित्र
उपजविकळहो॥१५॥ धराभारहरावयागोविंदु॥ कळवळ्याचेसखेबंधु॥ करविला
तेथगोत्रवधु॥ साह्यसमंधुराजभारेंसि॥१६॥ श्लोक॥ भूभारराजपृतनायदुभि
र्निरस्यगुप्तैः स्वबाहुभिरचिंतयदप्रमेयः॥ मन्येवनेननुगतोप्यगतंहिभारंय
द्यादवंकुलमहोअविषह्यमास्ते॥३॥ टीका॥ ऐसेपक्षपातिराजेअपार॥ अमि
तसेनाधराभार॥ मारविलेअधर्मकर॥ निमिषांतरकळहाचें॥१७॥ पृथ्विचेअध

र्मसेनासंभार॥ सौंधसौंधुंमारिलेराजेअपार॥ तरिंउतरलाधराभार॥ हेंसारंगधर
नमनिचि॥१८॥ यादवकरुनिअतुळबळ॥ नानादुष्टवैंदमिलेसकळ॥ यादवजाले
अतिप्रबळ॥ हेंनमनेचिकेवळश्रीकृष्णासि॥१९॥ नव्हतांयादवांचेंनिदान॥ नुतरेध
राभारसंपूर्ण॥ ऐसेंमानिताजालाश्रीकृष्ण॥ कुळनिर्दळणतोचिंतिं॥२०॥ अग्निका
पुरखाउनिवाढे॥ कापुराअंतिंअग्निहिउडे॥ तैसेयादवांचेअतिगाढे॥ आलेरा
कडेनिदान॥२१॥ केळिफळेंतवंवाढेवाढि॥ फळपाकेंमाळिझाडतोडि॥ तैसियाद
वकुळाचिगाढि॥ चढलिरोकडिमरणार्थ॥२२॥ फळपरिपाकेंपरमळि॥ तेंघेउनिजा
यमाळि॥ तैसेंस्वकुळफळवनमाळि॥ त्याविपाततत्काळिंस्वयेंइछि॥२३॥ अनंतबाहु
प्रतापें॥ यादववाढलेश्रीकृष्णकृपें॥ तोचिनिधनाचेनिसंकल्पें॥ काळरूपेंझोंबला॥
२४॥ अतुळबळेंअतिप्रबळ॥ वाढलेंजेंयादवकुळ॥ तेंविरदेखोनिसकळ॥ असा

ह्यकेवळश्रीकृष्णासि॥२५॥श्लोक॥नैवान्यतःपरिभवोस्यभवेत्कथंचिन्मत्संश्र 
यस्यविभवोन्नहनस्यनित्यं॥अंतःकलिंयदुकुळस्यविधायवेणुस्तंबस्यव
न्हिमिवशांतिमुपैतिधामा॥४॥टिका॥मजगेलियांनिजधामा॥हेचिप्रवर्त्तति
लअधर्मा॥श्रीयानंहूअतिगर्वमहिमा॥मुख्यअकर्मानिजहेतु॥२६॥हेमद्व
ळेंअतिप्रबळ॥त्रिर्तिरथिजालेसकळ॥यासिअप्रतिमदिग्मंडळ॥यांतेंदमिता
केवळमियेकु॥२७॥हेनाटापतिइंद्रादिदेवा॥दैत्याराक्षसाकांदानवा॥सेखिंनिर्द
ळाव्यायादवा॥मागुतेंमजतेंक्रापडेलयेणें॥२८॥तरिआतांचिआपुलेदिठि॥
ळ कुळबांधोकाचिगाठि॥ऐसाविचारजगजेठि॥निश्चयेंपोटिदृढकेला॥२९॥यदु 
वंशवंशजाळि॥वाढलिश्रीकृष्णकृपाजळि॥तेथअवघ्रंपेचिइंगळि॥रुषिशा
पमेळिंकपटेंपाडिलि॥३०॥तिमुळिंपेटलिकृष्णसंकल्पें॥धडाडिलिब्रह्मशापें॥

तेस्वजनविरोधरूपें॥काळाग्निकोपेंनाशिल॥३१॥ऐसेयदुकुळनिर्दळन॥करुनियां
स्वयेंश्रीकृष्ण॥निसुरनिजधामागमन॥स्वलिलाआपणकरुंइछि॥३२॥श्लोक॥
एवंव्यवसितोराजन्सत्यसंकल्पइश्वरः॥शापव्याजनविप्राणांसंदहेस्वकुळं
विभुः॥५॥टिका॥यापरिआपुलेंकुळ॥नाशुआदरिलेंतत्काळ॥हाचिविचारु
अढळ॥केलासमुळक्षयार्थ॥३३॥हेचिकार्यहोयकैसें॥तेंविचारिजेजगदिशें॥
ब्रह्मशापाचेनिमिषें॥कुळअनायासेंनाशेल॥३४॥इतुकेंहेंजेंसिधिजाये॥तें
संपलेंअवतारकृतकार्य॥मगस्वधामायदुवर्य॥जावोंपाहेस्वलिळा॥३५॥लिळा
विग्रहिंसुंदरपण॥गुणकर्मक्रियाअतिपावन॥जगदोद्धारीश्रीकृष्ण॥ब्रह्मपु
र्णपुर्णावतार॥३६॥श्लोक॥स्वमूर्त्यालोकलावण्यनिर्मुक्त्यालोचनंनृणां॥गी
र्भिस्ताःस्मरतांचित्तंपदैःस्तानीक्षतांक्रियाः॥६॥टिका॥जोसकळमंगळाम

गळपुर्ण॥ जोकांगोकुळिंकामरमण॥ मोक्षाचेंतारुस्वयेंश्रीकृष्ण॥ ज्याचेंबरवेपण
अलौकिक॥ ३७॥ जोभक्तकामकल्पद्रुप॥ मनोहरमेघश्याम॥ ज्याचेंत्रिलोकिंदादुगें॥
नाम॥ स्वयेंपुरुषोत्तमशोभतु॥ ३८॥ श्रीकृष्णाच्यासौंदर्यापुढें॥ लक्ष्मिभुलोनिजा
लिवेडें॥ मदनपोराआलेंबापुडें॥ तेथकोणिकडेइंद्रचंद्रु॥ ३९॥ त्रैलोक्यिचेंबरवेपण॥
भुलोनिकृष्णापासिंआलेंजाण॥ नानाकृष्णवेषेंबरवेपण॥ शोभेसंपुर्णतिहिंलो
किं॥ ४०॥ जोसकळसौंदर्याचिशोभा॥ किंलावण्याचाअतिवालभा॥ ज्याचियाअंग
संगप्रभा॥ आणिलिशोभाजगासि॥ ४१॥ जोसोलिवहरिखाचाहरिख॥ किंसुख 
सुखावतेंपरमसुख॥ ज्याचेनिविश्रांतिसिदेख॥ होयआत्यंतिकविसावा॥ ४२॥
तोअमुर्त्तमुर्त्तिधारणु॥ किंसकळलोकुलालणु॥ शोभाशोभविश्रीकृष्ण॥ सौभा
ग्यसंपुर्णसाजिरा॥ ४३॥ घृतथिजलेंकांविघरलें॥ परिघृतपणनाहिंमुकलें॥ ते

विअमुर्त्तमुर्त्तिमुसावलें॥ परिलेंसंचलेंपरब्रह्म॥ ४४॥ तयासिदेखिलियांचिपुरे॥ देखा
देखिदेखणेंसरे॥ पाहाणेंपाहातेंनिरसिमाघारें॥ लाजोनिवोसरेसलज्ज॥ ४५॥ दृष्टिधा
लिदेढेंकर॥ आलैंपेआपणसेजार॥ होउनियांपरात्पर॥ सुखावेसाचार॥ श्रिकृष्णरूपिं॥
॥ ४६॥ श्रीकृष्णाचियाचाखिल्यांगोडी॥ रसस्वादुरसनासोडि॥ जायेचाखणेपणाचि
आवडि॥ चाखलेंदवडिचाखोनि॥ ४७॥ नवलतेथिचेंगोडपण॥ अमृतहिफीकेंकेलें
जाण॥ यापरिरसनाआपण॥ हरिरसिंसंपुर्णसुखावे॥ ४८॥ लागतांश्रीकृष्णसुवावो॥
अवघासंसारचिहोएवावो॥ सेवितांकृष्णसुगंधभावो॥ घ्राणासिपाहोनावडेआन॥
॥ ४९॥ वाससुवाससुमन॥ घ्रेयघ्राताआणिघ्राण॥ कृष्णमकरंदेंजाण॥ विश्रांतिसं
पुर्णस्वयेंयेति॥ ५०॥ जयाचेनिजअंगस्पर्शें॥ देहदेहिंदेहपणेंनसे॥ आंगचिआंगालें
कैसें॥ विसरेआपेसंदेहबुधि॥ ५१॥ का[illegible]ठिणाकठिणपणगेलें॥ मृदाचेंमृदप

णहिनेलें।। कृष्णस्पर्शें असें केलें।। स्पर्शाचें गेलें स्पर्शत्व।। ५२।। तयाचें निपढणें [illegible]चा।।
वावो वाच्य वाचकाचा।। नेतिशब्दें पुसोनि साचा।। करि शब्दाचा निःशब्द।। ५[illegible]।। बो
लु बोलणें चि ठेलें।। बोलतें नेणों काय जालें।। कृष्णशब्दें ऐसें केलें।। वाचाचें नेलें वाचि
क।। ५४।। चित्तें चिंतिता पाये।। चित्तपणा विसरोनि जाये।। मग निश्चीतपणें पाहे।। कृ
ष्णचरणीं राहे निवांत।। ५५।। चित्त चित्ता चिंतन।। तिंहि चि नुरे आठवण।। चिंतितां श्री
कृष्णचरण।। पुर्ण परिपुर्ण निजचित्त।। ५६।। नवल तयाचा पराक्रम।। पाहातां पा
रुषे कर्माकर्म।। मग कर्म कर्त्ता क्रिया भ्रम।। करि निभ्रम पदरजें।। ५७।। पाहातां पाउ
लाचे माग।। तुटति कर्माकर्माचे लाग।। कर्माचें माया मुख्य आंग।। तिचा हि विभाग
उरों नेदि।। ५८।। गायि मागिल कृष्ण पाउलें।। पाहातां कर्म कर्त्ते निसिंगेलें।। अक
र्मपण लें ना हि उरलें।। ऐसें कर्म केलें निष्कर्म।। ५९।। जयाचेनि कीर्त्ति श्रवणें।। श्रोता 

नुरे श्रोतेपणें।। वक्ता पारुषे वक्तेपणें।। श्रवणें पावणें परब्रह्म।। ६०।। श्लोक।। अछिद्र
कीर्त्तिं सुश्लोकां वितत्य ह्यंजसा नु कौ।। तमोनया तरिष्यंति अगात्स्वं पदमीश्वरः।।
।।७।। टिका।। या परि उदार कीर्त्ति।। थोरि केलि अवतारख्याति।। तेणें जड जीव उद्धर
ति।। श्रवणें त्रिजगति पावन होये।। ६१।। स्वधामा गेलियां चक्रधरु।। मागील तरावया
संसारु।। कृष्णकीर्त्ति सु कल्पतारु।। ठेउनि श्रीधरु स्वयें गेला।। ६२।। नवल तयातारुवा
चि स्थिति।। बुडउं नेणें कल्पांतिं।। श्रवणें तरले नेणों किति।। पुढें हिं तरति श्रधाळु।।
।। ६३।। श्री कृष्णकीर्त्तिचें तारुं।। घालितां आटे भवसागरु।। तेथ कोरडा पाउलिं उ
तारु।। श्रवणार्थी नरु स्वयें लाहे।। ६४।। जे कृष्णकीर्त्ति किरितिपठण।। त्यांच्या संसा
रासि पडे सुन्य।। कीर्त्ति वितळ अतिपावन।। त्यातें सुरगण वंदिति।। ६५।। आदरें पढतां
श्री कृष्णकीर्त्ति।। पायां लागति च्यारि मुक्ति।। त्याचेनि पावन त्रिजगति।। परमनि

वृत्तिहरिनामें ॥ ६६ ॥ कृष्णकीर्त्तिनामाक्षरें ॥ रिघतांचि श्रवणद्वारें ॥ भितरिलतमयेक
सरें ॥ निघेबाहेर गजबजुनि ॥ ६७ ॥ तवं कृष्णकीर्त्तिकथागजरिं ॥ तमासिगवोनुरेचि
बाहेरि ॥ धाकेंचि निमेसहपरिवारिं ॥ कृष्णकीर्त्तिमाझारि परमानंदु ॥ ६८ ॥ कृष्णकीर्त्ति
प्रतापप्रकासें ॥ संसार कृष्णमय दिसे ॥ कीर्त्तिकीर्त्तिमंता ऐसें ॥ दिअनायासें निजसु
ख ॥ ६९ ॥ जो देखिलिया देखणें सरे ॥ जो चाखिलिया चाखणें पुरे ॥ जो ऐकिलियां
ऐकणें वोसरे ॥ जो चिंतितां मुरे चित्तवृत्ति ॥ ७० ॥ ज्यांसि जालिया भेटि ॥ भेटिसि नपडे
तुटि ॥ ज्यासि बोलतां गोठि ॥ पडे मिथिठि परमार्थी ॥ ७१ ॥ ज्यांसि दिधलयां खेव ॥ खे
वाचि पुरे हांव ॥ ज्याचें घेतांचि नांव ॥ नासे सर्व महाभय ॥ ७२ ॥ तो सत्यसंकल्प ईश्वरु
स्वलिळा सर्वेश्वरु ॥ स्वपदा सारंगधरु ॥ अतिसत्वरु निघाला ॥ ७३ ॥ ॥ राजोवाच ॥
ब्रह्मण्यानां वदान्यानां नित्यं वृद्धोपसेविनां ॥ विप्रशापः कथमभूद्वृष्णीनां कृष्ण

१८

चेतसां ॥ ८ ॥ टिका ॥ आदरें पुसे परिक्षिति ॥ यादव विनित विप्रभक्ति ॥ त्यांसि शापु घडे
केश्यापरिति ॥ सांगा मज प्रति शुकयोगीद्रा ॥ ७४ ॥ यादव दानें अति उदार ॥ राजे होउनि प
रम पवित्र ॥ ब्राह्मणसेवे सितत्पर ॥ आज्ञाकार कृष्णाचे ॥ ७५ ॥ यादव सदां कृष्णयोगें
सिं ॥ नित्य साधु स्वयादवांपासिं ॥ तेथ विवसे नारद ऋषि ॥ शापु यादवांसि घडे केसा ॥ ७६ ॥
दक्षशापन बाधि कृष्णापासिं ॥ म्हणोनि नारद वसे द्वारकेसि ॥ तो श्रीकृष्ण असतां
आंगेसिं ॥ शापु यादवांसि घडे कैसा ॥ ७७ ॥ श्लोक ॥ यन्निमित्तः स वै शापो यादृशो द्वि
जसत्तम ॥ कथमेकात्मनां भेद एतत्सर्वं वदस्व मे ॥ ९ ॥ टिका ॥ शापासि मुळ मुख्य
संतापु ॥ केसेनि ब्राह्मणा आला कोपु ॥ कोणे परि चा दिधला शापु ॥ संक्षेपरुपु सांगा
वा ॥ ७८ ॥ यादव समस्त सखे बंधु ॥ यासि प्रतिपाळि श्रीगोविंदु ॥ येकात्मता स्वगोत्र सबं
धु ॥ त्यामाजि युध भेदु घडे कैसा ॥ ७९ ॥ आत्मा वै पुत्रनामासि ॥ हे श्रुति प्रमाण सर्वांसि ॥ रघ्प

तेथश्चापुबाधीकृष्णात्मजासि॥ केविआलेंयासिसत्यत्व॥८०॥कृष्णसंकल्पकुळना
शन॥तोचिब्रह्मशापासिकारण॥यालागिबाधकजाण॥होयेसंपुर्णयादवां॥८१॥
सृष्टिसृजिपाळिसंहारि॥हिंकृष्णसंकल्पमात्रेंकरि॥तोयदुकुळनिधननिर्धा
रिं॥त्याचिअवतारथोरिशुकसांगे॥८२॥श्लोक॥ ॥श्रीशुकउवाच॥ ॥बिभ्रद्वपुः
सकलसुंदरःसन्निवेशंकर्माचरन्भुविसुमंगलमाप्तकामः॥आस्थायधामरम
माणउदारकीर्त्तिःसंहर्त्तुमैच्छतकुलंस्थितकृत्यशेषः॥१०॥टिका॥कर्माणिपुण्य
निवपानिसुमंगलानिगायज्जगत्कलिमलापहराणिकृत्वा॥कालात्मनानिवस
तायदुदेवगेहेपिंडारकंसमगमन्मुनयोनिसृष्टाः॥११॥टी०॥रायातेंह्मणेश्रीशु
कु॥करताकरविताश्रीकृष्णुयेकु॥तोशापार्थअत्यंतिकु॥आत्मजांअविवेकुउप
जविस्वये॥८३॥स्वयेंजालियानिजधामा॥थोरिआवडिपुरुषोत्तमा॥यालागीअ १९

वशेषकर्मा॥मेघश्यामालवलाहो॥८४॥केव्हाहोइलकुळक्षयो॥हेंचिमनिधरिदेवो॥
तोदेवाचाचिभावो॥शापासिपाहोदृढमुळ॥८५॥जोकुळक्षयातेंचिंति॥त्याश्रीकृष्णा
चिसुंदरमुर्त्ति॥शुकुसांगेपरिक्षितिप्रति॥स्वानंदस्थितिउल्हासें॥८६॥सकळसौंद
र्याअधिवासु॥धरूनिमनोहरनटवेषु॥लावण्याकेळान्यासु॥आणिजगदिशुनि
जांगे॥८७॥नवलसौंदर्याब्धिकउगि॥सर्वांगिंगुंतल्याजनाच्यादृष्टि॥कृष्णस्वरुपींमि पदे
ळव गि॥होतलुंलुंबुटिडोळयां॥८८॥जैस्यागुळिंमासिवरिमासि॥तेविदृष्टिवरिदृष्टिकृष्ण्
रुपासि॥सर्वांगीविंदुनिचौपसि॥अहर्निशिंनोसंडिति॥८९॥नयनलांचावलेलोभा॥
दृष्टिसिनिघालियाजिभा॥यापरिश्रीकृष्णशोभा॥स्वानंदगाभासाकार॥९०॥तोश्री
कृष्णदेखिलाज्यांदृष्टि॥तेपरतोनिमागुतिनुगि॥अधिकाअधिकघालिमिगि॥
देखसकळसृष्टिश्रीकृष्णं॥९१॥ऐसिडोळयाआवडि॥ह्मणोनिकामिवरपडि॥

ची के

यालागीगोपिकागोडि॥अतिगाढिगोविंदि॥१२॥कृष्णअतिसुंदरमनोरम॥ह्मणौनिअ आध्या १
सेलत्याविषयधर्म॥तरितोआवाप्तसकळकाम॥आत्मारामश्रीकृष्ण॥१३॥कृ
ष्णअवाप्तसकळकाम॥त्यासिकांद्वारकागृहाश्रम॥स्त्रिपुत्रराज्यसंभ्रम॥विष
यकामकांभोगी॥१४॥चहुआश्रमाप्रकाशकु॥त्रिलोकिंग्रहस्तकृष्णुयेकु॥तोचि
ब्रह्मचारिनैष्टिकु॥अतिनेटकुसन्यासि॥१५॥कृष्णदेहिंनाहिंदेवबळ॥लिळावि
ग्रहिचित्कल्लोळ॥त्याचिंसर्वकर्मपावनशिळ॥उधरिसकळश्रवणकथनें॥१६॥
कृष्णकर्माचिंजोकरिस्मरण॥तेंकर्मतोडिकर्मबंधन॥ऐसेंउदारकर्माचरण॥ २०
आचरलाश्रीकृष्णदीनोधार॥१७॥श्रीकृष्णअसेलसकाम॥ह्मणालयालागी
आचरेकर्म॥ज्याचेंनामनिर्दळिसर्वकाम॥तोस्वयेंसकामघडेकेवि॥१८॥
श्रीकृष्णाचास्मरतांकाम॥स्वयेंसन्यासिहोतिनिष्काम॥सकामाचानिर्दळे

काम॥ऐसेंउदारकर्मआचरला॥१९॥तेणेंआवाप्तसकळकामें॥ऐसिंआचरला
अगाधकर्में॥मानवितराव्यामनोधर्में॥कीर्त्तिमेघश्यामेंविस्तारिलि॥२००॥
केसेकर्मसुमंगळ॥कानिपडतांचिअकुमाळ॥नासोनियांकर्ममळ॥ज्ञानितत्काळ
श्रवणादरें॥१॥श्रवणेंउपजेसद्भावो॥सद्भावेंप्रकटेदेवो॥तेणेंनिर्दळेअहंभावो॥
ऐसिउदारपाहांहरिकीर्त्ति॥२॥श्रीकृष्णकीर्त्तिचेंस्मरण॥कांकरितांश्रवणपव
ण॥उद्धरलेबहुसालजन॥पुढेंभविष्यमानउद्धरति॥३॥जरिकेलियाहोति
पुण्यराशि॥तरिअवधानहोयहरिकथेसि॥येरुविंऐकतांयेरासि॥लागेअना
यासिंअतिनिद्रा॥४॥जोहरिकथेसिसादर॥त्याच्यापुण्यासिनाहिंपार॥कृष्णें
सुगमोपावोकेलाथोर॥दिनोधारहरिकीर्त्तनें॥५॥कृष्णकीर्त्तनेंगर्जतांगोवि॥ला
उतरल्यातिर्थांचियाउवि॥ ॥नामासाठिंनिजमोक्षु॥६॥ऐसा

ऐसानिजकीर्त्तिउदार॥पुर्णब्रह्मसारंगधर॥लीळाविग्रहिसर्वेश्वर॥पुर्णावतार आध्या १
यदुवंसि॥७॥उतरलाधराभारयेथ॥सत्यनमनिश्रीक्रुष्णनाथ॥यादवआले ३२
अतिअद्भुत॥हिहिसमस्तनिर्दळावे॥८॥येअवतारिंऋषिकेषि॥ह्मणेहेंचि ह्म
सउरलें आह्मासि॥निर्दळुनिनिजवंशासि॥निजधामासिनिघावें॥९॥तो
यादवामाजिमाधव॥काळात्मादेवादिदेव॥जाणोनिभविष्याचाभाव॥का
र्यअपुर्वकरिताजाला॥१०॥नारदादिमुनिगण॥त्यासिपाचारुनिआपण
करुंसागेशीघ्रगमन॥स्वयेंश्रीक्रुष्णसाक्षेपें॥११॥ज्यापासुनिसंतदुरिगेले॥ २१
तेथअनर्थाचेकेलेचाळे॥हेयादवनिधनालागीवहिले॥लाघवकेलेंश्रीक्रुष्णें
॥१२॥भक्तसंतसाधुज्यापासि॥तेथ-रिघुनाहिंअनार्थासि॥हेंस्वयेंजाणे
ऋषिकेषि॥येरांकोणासिकळेना॥१३॥जेथसंताचासमुदावो॥तेथजन्म

मरणाअभावो हाश्रीक्रुष्णचिजाणेभावो तोकरिउपावअनर्थापार्थ १४ जेथुनिसंतगे
लेदुरि तेथसद्यअनर्थुवाजेसिरिं हेजाणोनियांश्रीहरि द्वारकेंबाहेरिरुषिघालि
१५ रुषिजातहोतेस्वाश्रमासि त्यांतेंधौलाघविरुषिकेषि तीर्थविशेषेंसमस्तासि
पिंडारकासिस्वयेंधाडि १६ पिंडारकामुनिगण श्रीक्रुष्णेंधाडिलेकोणकोण ज्यां
चेंकरितांचिस्मरण कळिकाळआपणभयेंकांपे॥१७॥श्लोक॥ ॥विश्वामित्रोसितः
कण्वोदूर्वासाभृगुरंगिराः॥कश्यपोवामदेवोत्रिर्वसिष्ठोनारदादयः॥१२॥टिका॥जे
तपोतेजेंदेदीप्यमान जेपुर्णज्ञानेंज्ञानघन ज्यांतेंसदावंदिश्रीक्रुष्ण तेऋषिश्व
रजाणनिघाले १८ जोगायत्रिमंत्रासाठिं करुंसकेप्रतिश्रुष्टि जोविश्वामित्रम
हाहटि तोहिउगउठिनिघाला १९ जेथनबाधीउल्लसित तेआश्रमीवसेअ
सित ज्याचेनिनामेंद्वंद्वेंपळत तोहिलरितनिघाला २० जोसुर्यासिरिघोनरा

रण॥अश्वाचेकर्णिंबैसोनिआपण॥पुर्णकेलेंवेदपठण॥तोकण्वहिजाणनिघाला॥२१॥
दुर्वासाजोअन्याहारि॥आहारसेउनिनिराहारि॥तोहिद्वारकेबाहेरि॥त्वरेकरिनिघा
ला॥२२॥भृगुचाश्रीचरण॥हृदइंवाहेनारायेण॥मिरविश्रीवत्सभुषण॥तोभृगुहिजा
णनिघाला॥२३॥अंगिरास्वयेंसल्लुहिश्रुष्ठि॥ब्रहस्पतिजन्मलाज्याचापोटिं॥जोप
रमगुरुदेवाचामुगुटिं॥तोहिउठिगमनार्थी॥२४॥कश्यपाचिनवलगोष्टि॥सुरनरपन्न
गजन्मलेपोटिं॥यालागिहिकाश्यपिश्रृष्टि॥तोकश्यपुउठिनिजगमनें॥२५॥मुक्ता
माजिश्रेष्ठभावो॥वेदिंचीखाणेंवामदेवो॥तोहिद्वारकेहोनिपाहो॥स्वयेंस्वमेवोनिघा २२
ला॥२६॥अत्रिचिनवलपरि॥तिन्हिदेवजन्मलेउदरिं॥श्रीदत्तुवंदिजेयोगेश्वरिं॥हे
अगाधथोरिअनुसयेचि॥२७॥तोस्वयेंअत्रिरूषिश्वर॥श्रीदत्तआज्ञातत्पर॥पिं
डारकाअतिसत्वर॥प्रयाणशिघ्रतेणेंकेलें॥२८॥जोश्रीरामाचासद्गुरु॥ब्रह्मज्ञा

नेंअतिउदारु॥ज्याचेकाग्निचाप्रतापथोरु॥जिंकिलादिनकरतपोतेजें॥२९॥ऐसाजो
वसिष्ठमुनि॥तोहिब्रह्मसज्ञामानुनि॥निघालाद्वारकेहोनि॥शीघ्रगमनिंपिंडारका
॥३०॥आणिदेवरुषिनारद॥ज्याचाहिअगाधबोध॥ज्यासिसर्वदापरमानंद॥अति
अल्हादहरिकीर्त्तनिं॥३१॥ब्रह्मविणास्वयेंवात्तु॥ब्रह्मपदेंगीतिंगात्तु॥ब्रह्मानंदेंना
चत्तु॥निघेडुल्लत्तुपिंडारका॥३२॥इत्यादिमुनिवर॥श्रेष्ठश्रेष्ठरुषीश्वर॥शिष्यसमु
दायेंसपरिवार॥मिनलेअपारपिंडारकिं॥३३॥एवंपिंडारकिंरुषिसर्व॥शापानुग्रहिमा
हानुभाव॥मिनलेब्रह्मवैभव॥अतिअपुर्ववर्णिति॥३४॥बापुलाघविवनमाळि॥कु
ळक्षयोघडेतत्काळिं॥कुमरिंरुषिसिंरांडोळि॥कपटमेळिंमांडिलि॥३५॥निंदाअ
वज्ञाहेळणा॥करितांब्राह्मणासिछळणा॥जेथब्रह्मद्वेषुसंपुर्ण॥कुळक्षयोजा
णतेठाइं॥३६॥ब्राह्मणाच्याकोपापुढें॥कुळकाइंसेंबापुडें॥माहादेवाचेंलिंगस

डे इंद्रपदविपडेसमुद्रिं ३७ तोसमुद्रहिकेलाक्षार ऐसाद्विजकोपज्वलितदुर्धर
हेंयेकयेकाचेंचरित्र तेऋषिसमग्रमिनलेयेथ ३८ धरातळिंब्रह्मब्राह्मण
त्याचेंवचनपरमप्रमाण हेसत्यकराव्याश्रीकृष्ण कुळनिर्दळणस्वयेंदावि ॥३९॥
श्लोक ॥ क्रीडंतस्तानुपाव्रज्यकुमारायदुनंदनाः ॥ उपसंगृह्यपप्रछुरविनीताविनीतवत् ॥१३॥ टीका ॥ यदुनंदनसमस्त क्रिडाकंदुकखेलित एकमेकातेंहाणत ठकुनिपळतपरस्परें ४० ऐसेनानाक्रिडाविहार करितआलेयदुकुमार आंगीश्रीमदअपार ओधलेंथोरउन्मत्त ४१ अतितअनागतज्ञानवंत · २३
ऋषिश्वरमिनलेसमस्त याचेंवचनयथार्थभुत यांसिहिनिश्चितठकुंआलिं ४२ अघडतेंयेउनिपडे तैयाचेंवचनकैसेंघडे ह्मणोनिरुषिश्वरापुढें मांडिलेंकुडेंयदुकुमारिं ॥४३॥ श्लोक ॥ तेवेषयित्वास्त्रीवेषैः सांबंजांबवतीसुतं ॥ एषापृछतिवोविप्राअंतर्वत्न्यसितेक्षणा ॥१४॥ टिका ॥ पहिलेंचिश्रीमदेंउद्भट ॥ त्यावरिमांडिलेंकपट ॥ सांबासिस्त्रिनट ॥ अतिवरिष्टबाणिला ॥४४॥ तोश्यामसुंदरडोळसु ॥ आंगीशोभलास्त्रिवेषु ॥ प्रमदावैभवविलासु ॥ हावविन्यासुसलज्ज ॥४५॥ नयनिंसोगयाचेंकाजळ ॥ व्यंकटकपटाक्षेंअतिचपळ ॥ सुंदरसकुमारवेल्हाळ ॥ चालेनिश्चळहंसगमनि ॥४६॥ वस्त्रेंबांधोनियांउदर ॥ नावेककेलेंथोर ॥ तेणतेगुरोदर ॥ दिसेसाचारइतरासि ॥४७॥ हालुघालुनिसखिचारवांदि ॥ चालतांउदरहालेंनेंदि ॥ विसांवाघेतपदोपदिं ॥ एतऋषिवृंदेंदेखिलि ॥४८॥ ऐसास्त्रिवेषदाखउनि ॥ नावेकअंतरेंराहोनि ॥ इतरऋषिजवळियेउनि ॥ लोटांगणिघातलि ॥४९॥ पुर्वश्लोकिचेश्लोकार्धतेथ ॥ व्याख्यानिनव्हेचिसंमत ॥ यालागीतेंचियेथ ॥ वाखाणिलेंगतकथान्वयें ॥५०॥ छकाचेनिमिसेंजाणा ॥ ऋषिसि

करितिप्रदक्षिणा॥ अत्यादरें लागलेचरणा॥ स्वामिच्यादरुषनाआलिआलों॥ ५१॥ आध्या १
ऐसेयदुकुमरसमस्त॥ अविनितपरिविनितवत॥ करजोडुनिराहिलेतेथ॥ म्हद
विनवितमुनिश्वरां॥ ५२॥ स्वामिजिपैलहेसुंदर॥ तुमचावचनिभावार्थथोर॥ आ
सन्नप्रसवगुरोदर॥ स्वयेंसकुमारपुसोंलाजे॥ ५३॥ श्लोक॥ ॥ प्रष्टुंविलज्जती
युष्मान्प्रवृत्तामोघदर्शनाः॥ प्रसोष्यंतीपुत्रकामाकिंस्वित्संजनयिष्यति॥ १५॥
टिका॥ स्वयेंयेउनितुलाप्रति॥ तिचेनिनोबलवेनिश्चितिं॥ यालागीआलाहाति॥
सेवेसिविनतिकरविलि॥ ५४॥ तुम्हिंसत्यदर्शिसाचार॥ अमोघवीर्यतुमचेंउत्त २८
र॥ सिरिंवंदितिहरिहर॥ ज्ञानेंउदारतुम्हिसर्व॥ ५५॥ यालागीहेगर्भवंति॥ साद
रअसेपुसति॥ पुत्रकामाअसेवांछिति॥ कायनिश्चितिंप्रसवेल॥ ५६॥ ऐसेंकप
टाचेनिवालभों॥ तेसिचिफलेंभावगर्भे॥ छलप्रलोभेंपावति॥ ५७॥ कर्मजाणोनि

विनवित कारजोडूनिउभे॥

यांकुडें॥ नारदुनाचेरुषिपुढें॥ मनिम्हणेयादवांचेंगाढें॥ निदानरोकुडेवोडवलें॥
गि ५८॥ जेविमुंयेनिघालेपारख॥ तिसिमरणयेअचुक॥ तेविब्राह्मणछळणेदेख॥
अवस्यककुळनासु॥ ५९॥ शापितआलियांद्विजजन॥ त्यासिसद्भावेंकरिंनमन॥
मारुंआलियांब्राह्मण॥ मस्तकआपणवोडवावा॥ ६०॥ त्याब्राह्मणासिजेंछळ
ण॥ तेंजाणावेंविषभक्षण॥ विषेंनिमेभक्षिताचाप्राण॥ कुळनिर्दळणद्विजछ ५
ळणें॥ ६१॥ अविद्यसुविद्यनम्हणतांजाण॥ तैरातळिंब्रह्मब्राह्मण॥ त्याचेंकरुं
जातांछळण॥ कुळनिर्दळणअवस्य॥ ६२॥ श्लोक॥ एवंप्रलब्धामुनयः तामूचुः
कुपितान्नृप॥ जनयिष्यतिवोमंदामुसळंकुळनाशनं॥ १६॥ टिका॥ ऐकेंपरिक्षि
तिन्नृपवरा॥ यापरियादवकुमरा॥ निधनाचाआलावारा॥ तेरुषिश्वरांछळुंगे
ले॥ ६३॥ कपटजाणोनियांसाचार॥ थोरकोपलेऋषिश्वर॥ मगकायतिहिवाग

आ॰ ६
१

त्र ॥ अतिअनिवारसोडिलें ॥ ६४ ॥ आरे हें प्रसवेल बाळ ॥ तो होइल सकळकुळा का
निखळ ॥ मुसळ लोहाचें मुसळ ॥ देखाल सकळ तुह्मि मंदभाग्य ॥ ६५ ॥ श्लोक ॥ त
छ्रुत्वा चातिसंत्रस्ता विमुच्य सहसोदरं ॥ सांबस्य ददृशुस्तस्मिन्मुसळं खल्वयः
स्मयं ॥ १७ ॥ टीका ॥ ऐकोनि शापाचें उतर ॥ भयभित जाले कुमर ॥ सोडुनि शांबा
चें उदर ॥ अति सत्वर दाविति ॥ ६६ ॥ तवं लोहमय मुसळ ॥ देखते जाले तत्काळ ॥
ळ मग भयभित विव्हळ ॥ एकाकि सकळ दचकोनि गेले ॥ ६७ ॥ नासावें यादवकुळ ॥ ए
सा कृष्ण संकल्प सबळ ॥ तोचि जाला लोहाचें मुसळ ॥ जाणत काळ रुषिवाक्य २५
सत्यें ॥ ६८ ॥ जें जें ब्राह्मणवचन ॥ तें अन्यथा होंने दि श्रीकृष्ण ॥ ब्राह्मणाचें जेंव
देवदन ॥ तें स्वयें श्रीकृष्ण सत्यत्वा आणि ॥ ६९ ॥ देखोनि रुषिश्वरांचा कोप ॥ ऐको
नि कुळक्षयाचा शाप ॥ यदुकुमरा अतिसंताप ॥ भयकंप सुटला ॥ ७० ॥ श्लोक ॥
किं कृतं मंदभाग्यैर्नः किं वदिष्यंति नो जनाः ॥ इति विह्वळिता गेहानादाय मुसळं य

युः ॥ १८ ॥ टिका ॥ आह्मि मंदभाग्य करंटे ॥ रुषिश्वरां कोपविलें शाठें ॥ निजघात जालों पैं ठे
कुळक्षयो कपटें जोडिला आहिं ॥ ७१ ॥ काय ह्मणति नगरजन ॥ कां छळुं गेले हे ब्राह्मण ॥
चिंताक्रांत म्लानवदन ॥ मुसळ घेउन गृहा आले ॥ ७२ ॥ श्लोक ॥ तच्चोपनीय सदसि प
रिम्लानमुखश्रियः ॥ राज्ञ आवेदयांचक्रुः सर्वयादवसन्निधौ ॥ १९ ॥ टीका ॥ सभेसि व
२ सुदेव उग्रसेन ॥ बळराम अनिरुद्ध प्रद्युम्न ॥ यादव बैसले संपुर्ण ॥ येक ला श्रीकृष्ण तेथ
नाहिं ॥ ७३ ॥ सभेसां बादि आले सकळ ॥ पुढां ठेउनि लोहमुशळ ॥ शापु सांगीतला स
मुळ ॥ मुखकमळ अतिम्लान ॥ ७४ ॥ श्लोक ॥ श्रुत्वामोघं विप्रशापं दृष्ट्वा च मुसळं नृप ॥
विस्मिता भयसंत्रस्ता बभूवुर्द्वारकौकसः ॥ २० ॥ टिका ॥ ऐकोनि द्विजांचा परम को
प ॥ यादवा सुटला महाकंप ॥ मिथ्या नव्हे ब्रह्मशाप ॥ भयसंताप सर्वांसि ॥ ७५ ॥ प्रत
क्ष देखोनि मुसळ ॥ थोर सुटलि खळबळ ॥ नगरनागरिका हलकालोळ ॥ यादवकु
ळ उरे कैसें ॥ ७६ ॥ एक राया परिक्षिति ॥ सबळ भविष्याचि गति ॥ रतां तु श्रीकृष्णासि

नसंगति॥ विंचारू आपमतितिहिंकेला॥७७॥ श्लोक॥ तच्चूर्णयित्वामुसळंयदुराजस आध्या १
आहुकः॥ समुद्रसलिलेप्रास्यलोहंचास्यावशेषितं॥२१॥टी०॥ आहुकरों उग्रसेन॥ ओ
लेणेंलाउनिलोहाचेंघण॥ मुसलकरुनियांचुर्ण॥ समुद्रिंजाणघालविलें॥७८॥ त्या
मुसळाचामध्यकवळ॥ चूर्णनव्हेचिअतिसबळ॥ उरलावज्रपायकेवळ॥ तोसमु
द्रिंतत्काळझुगारविला॥७९॥ श्लोक॥ कश्चिन्मत्स्योग्रसीह्लोहंचूर्णानिनरलैस्त
तः॥ उत्पमानानिवेळायांलग्नान्यासन्किलैरकाः॥२२॥टिका॥ मत्स्योग्रहीतोमे‍धे ५८
र्जालैनान्येसहार्णवे॥ तस्योदरगतंलोहंसशल्यंलुब्धकैःकरात्॥२३॥टिका॥ समु २६
द्रलाटाचेकल्लोळ॥ तेणेंतेंलोहचुर्णसकळ॥ प्रभासेलागोनिप्रबळ॥ उगिलेंतत्का
ळयरिकारूपें॥८०॥ हौंकें लोहकवळुमीनुगिळि॥ त्यामिनातेंसमुद्रजळिं॥ अ
न्यत्रमछांसहितजाळि॥ मछघ्नुआकळिनिजलाघवें॥८१॥ तोमछुमछघ्नवि
दारि॥ नवंलोहनिघेत्याचेउदरि॥ देखोनिहरिखलातोभारिं॥ आंतुडेकरिंतो

सभाग्यु॥८२॥ मछोदरिचेंलोहजाण॥ याचेंअत्रुकअनुसंधान॥ अगाधपारधिसा
धेपुर्ण॥ यालागिंतोबाणलुब्धकेंकेला॥८३॥ श्लोक॥ भगवान्ज्ञातसर्वार्थईश्वरो
पितदन्यथा॥ कर्त्तुनैछद्दिपशापंकाळरूप्यन्वमोदत॥२४॥टिका॥ कोणिहनसंग
मेहंपेरवणें॥ जाणितलेंसर्वज्ञेंश्रीकृष्णें॥ परिंद्विजशापुअन्यथाकरणें॥ हेंनिज
मनेंस्पर्शेंना॥८४॥ म्हणालहेंन्हवेत्यासि॥ पालटवेनाद्विजशापासि॥ जोनिमाल्या
आणिगुरुपुत्रासि॥ कृष्णुकळिकाळासिनियंता॥८५॥ पाडुनिकळिकाळाचेदांत॥
देवकिगतगर्भआणियेथ॥ इश्वराइश्वरश्रीकृष्णनाथ॥ जोणेसर्वार्थनिजसिद्दि॥८६॥
निद्रानमोडितांतिलुभरि॥ मथुराआणिलिद्वारकेभितरि॥ श्रीकृष्णकायथके
नकरि॥ तोहिममतानधरिकुळाचि॥८७॥ निजकुळाक्षयोजरिंजाला॥ तरिंअ
न्यथानकरिब्राह्मणबोला॥ ब्राह्मणिंपापराहाणितला॥ तोहिहृदयिंधरिलापदां
कु॥८८॥ तेंचिश्रीवत्सलांछन॥ सकळभुषणाभुषण॥ हृदइमिरविश्रीकृष्ण॥ या

लागीपुर्णब्रह्मण्यदेवो॥८९॥ श्रीकृष्णसिरिंवंदिब्राह्मण॥ अन्यथानकरिब्राह्म
णवचन॥ यालागिब्राह्मण्यदेवोपुर्ण॥ वेदबंदिजनवर्णिति॥९०॥ ब्राह्मरूपस्वयें
श्रीहरि॥ यालागीब्राह्मणाचाकेवारि॥ कुळक्षयोजालाजरि॥ तरिंद्विजावरि
क्षोभेना॥९१॥ ऐकोनिब्राह्मणाचाशाप॥ नधरिमोहाचाखटाटोप॥ ह्मणेसिध्धि
गेलाकृतसंकल्प॥ कुळक्षयानुरूपसंतोषे॥९२॥ यापरिश्रीगोविंदु॥ काळरूपें
मानिआनंद॥ कुळक्षयाचाक्षितिबाध॥ अल्पहिसमंधुधरिना॥९३॥ पुर्णसं
तोषश्रीकृष्णनाथा॥ पुढिलेअध्यायिंज्ञानकथा॥ अतिरसाळस्वानंदता॥
अवधानश्रोतामजद्यावें॥९४॥ जेथनारदुआणिवसुदेवा॥ संवादुहोइलसुहा
वा॥ जनकआणिआर्षभदेवा॥ प्रश्नोत्तरिंजोवाखानंदुवाढे॥९५॥ तेरसाळब्रह्म
ज्ञानमालु॥ चाखविननिजपरमार्थु॥ येकाजनार्दनाविनवितु॥ श्रोतेकृपाकरितु
अर्थावबोधें॥९६॥ इतिश्रीभागवतेमहापुराणेपारमहंस्यसंहितायांएकादशस्कं